# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०९/०९/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०९/०९/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. ०६/०९/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ४. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ५. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ६. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ७. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ८. | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| २. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ३. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ४. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ५. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ६. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ७. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ८. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे आणि अधिका-यांचे हार्दिक स्वागत. आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण करावी अशी विनंती. सचिव साहेब आपण सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०९/०९/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. ०६/०९/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८६, विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील रा.म. क्र. ०८ जवळील घोडबंदर गांव येथील अमृतेश्वर महादेव मंदीरा जवळील संरक्षण भिंत दि.०६/०९/२०१४ रोजी सुमारे पहाटे २.३० वाजता अचानक कोसळली. सदर ठिकाणी कोणतीही जिवित व वित्तहानी झाली नाही. सदर संरक्षण भिंत लगतचा ३.०० मी रस्ता खचल्यामुळे घोडबंदर गांव ते वर्सोवा नाका पर्यंत वाहतुक बंद झाले आहे. घोडबंदर गांव ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ (सगनादेवी मार्ग) हा रस्ता पर्यायी खुला आहे. घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधण्याची व रस्ता दुरूस्तीची अत्यंत गरज आहे. सदर कामाचे डीझाईन मे. एच.एम.राजे कंन्सल्टंट प्रा. लि. यांच्या मार्फत तातडीने करून घेण्यात आले आहे. त्याअनुशंगाने खालीलप्रमाणे अंदाजपत्रके बनविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधणे. | रु. ३३,९२,९००/- |
| २ | घोडबंदर गांव रेती बंदर अमृतेश्वर महादेव मंदीर ते रिलायन्स ट्रान्सफॉर्मर पर्यंत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. १३,६८,५००/- |

घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर परिसरात दाट लोकवस्ती असल्यामुळे व पुढील अपघात टाळण्यासाठी कामपुर्ण करून घेण्यासाठी सदर जागेत बॅरेकेटींग करावी लागणार आहे. घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीरा लगतच रेती बंदर येथे रेती व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो व सदर रस्त्यावरून रेती वाहतूक मोठयाप्रमाणात होते. त्यामुळे सदर काम हे मुख्य रस्त्यावर असल्याकारणाने तातडीने करून घेणे आवश्यक आहे.

अ.क्र. ०१ च्या कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नाला क्रॉसिंग करीता कल्वर्ट बांधणेच्या कंत्राटदाराकडून मंजूर दराने करून घेता येईल. तसेच रस्त्याचे काम देखील मंजूर दराने कंत्राटदाराकडून करून घेता येईल. सदर प्रस्तावित कामे मंजूर दराने संबंधित कंत्राटदाराकडून करून घेण्यास व वरील कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामे तातडीने पुर्ण करून रस्ता सुरू करण्यात यावा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८६ :-**

कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील रा.म. क्र. ०८ जवळील घोडबंदर गांव येथील अमृतेश्वर महादेव मंदीरा जवळील संरक्षण भिंत दि.०६/०९/२०१४ रोजी सुमारे पहाटे २.३० वाजता अचानक कोसळली. सदर ठिकाणी कोणतीही जिवित व वित्तहानी झाली नाही. सदर संरक्षण भिंत लगतचा ३.०० मी रस्ता खचल्यामुळे घोडबंदर गांव ते वर्सोवा नाका पर्यंत वाहतुक बंद झाले आहे. घोडबंदर गांव ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ (सगनादेवी मार्ग) हा रस्ता पर्यायी खुला आहे.

घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधण्याची व रस्ता दुरूस्तीची अत्यंत गरज आहे. सदर कामाचे डीझाईन मे. एच.एम.राजे कंन्सल्टंट प्रा. लि. यांच्या मार्फत तातडीने करून घेण्यात आले आहे. त्याअनुशंगाने खालीलप्रमाणे अंदाजपत्रके बनविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधणे. | रु. ३३,९२,९००/- |
| २ | घोडबंदर गांव रेती बंदर अमृतेश्वर महादेव मंदीर ते रिलायन्स ट्रान्सफॉर्मर पर्यंत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. १३,६८,५००/- |

घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर परिसरात दाट लोकवस्ती असल्यामुळे व पुढील अपघात टाळण्यासाठी कामपुर्ण करून घेण्यासाठी सदर जागेत बॅरेकेटींग करावी लागणार आहे. घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीरा लगतच रेती बंदर येथे रेती व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो व सदर रस्त्यावरून रेती वाहतूक मोठयाप्रमाणात होते. त्यामुळे सदर काम हे मुख्य रस्त्यावर असल्याकारणाने तातडीने करून घेणे आवश्यक आहे.

अ.क्र. ०१ च्या कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नाला क्रॉसिंग करीता कल्वर्ट बांधणेच्या कंत्राटदाराकडून मंजूर दराने करून घेता येईल. तसेच रस्त्याचे काम देखील मंजूर दराने कंत्राटदाराकडून करून घेता येईल.

सदर प्रस्तावित कामे मंजूर दराने संबंधित कंत्राटदाराकडून करून घेण्यास व वरील कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामे तातडीने पुर्ण करून रस्ता सुरू करण्यात यावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ ११.०० वाजता.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**